मा. कुलगुरु यांचे कार्यालय
सावत्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
आवक दिनांक 23 JAN 2025
आवक क्रमांक व्हीसी 460
जावक दिनांक 23 JAN 2025

Subject **चाणक्य मंडल परिवार आयोजित राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व आणि वादविवाद स्पर्धेसाठी आमंत्रण**

From Chanakya Mandal Pariwar <office@chanakyamandal.org>

To <niranjancmp@gmail.com>

Date 22-01-2025 03:22 PM

---

आदरणीय प्राध्यापक,

चाणक्य मंडल परिवार तर्फे आयोजित *राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व आणि वादविवाद स्पर्धेची* घोषणा करताना आम्हाला अत्यंत आनंद होत आहे. ही स्पर्धा विद्यार्थ्यांच्या विचारशक्तीला चालना देण्यासाठी आणि प्रभावी वक्तृत्वकौशल्य विकसित करण्यासाठी एक उत्तम व्यासपीठ आहे.

*श्री. अविनाश धर्माधिकारी (**IAS)* सरांनी वैश्विकतेचे भान आणि कर्तृत्व असलेल्या युवा पिढीसाठी आणि राष्ट्रीय चारित्र्याचे व्यावसायिक तज्ञ तयार व्हावेत यासाठी चाणक्य मंडल परिवार या न्यासाची स्थापना १९९६ मध्ये केली. या शैक्षणिक चळवळीचा एक भाग म्हणजे या स्पर्धा आहेत.

[image: image.png]

विद्यार्थी विकास मंडळ
आवक क्र. 1737
28 JAN 2025
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

स्पर्धांचे तपशील:

१. *वक्तृत्व स्पर्धा* :

भाषा : *मराठी*, विषय : *भारत **@२०४७*

भाषा : *संस्कृत*, विषय : *प्रजान्तत्रस्य जननीत: विश्वामित्रपर्यन्तम् भारतदेश: ।*

२. *वादविवाद *स्पर्धा :

भाषा : *मराठी*, विषय : *समान नागरी कायदा : राष्ट्रीय एकात्मतेसाठी पाऊल की विविधतेला धोका**?*

- स्पर्धेचा दिनांक: *९ फेब्रुवारी २०२५*

- *अर्ज करावयाची शेवटची तारीख : २६ जानेवारी २०२५*

- ठिकाण : चाणक्य मंडल परिवाराचे वारजे केंद्र (पुणे)

- पात्रता: *१८ ते २५ वयोगटातील महाविद्यालयीन विद्यार्थी*.

- स्पर्धेमध्ये सहभागी होण्यासाठी स्पर्धकाचे नाव संबंधित महाविद्यालयामार्फतच *office@chanakyamandal.org

<office@chanakyamandal.org> *या ईमेलवर कळविणे अनिवार्य आहे.

- प्रत्येक महाविद्यालयामार्फत वक्तृत्व स्पर्धेतील मराठीसाठी १ व संस्कृतसाठी १ आणि वादविवाद स्पर्धेसाठी २ स्पर्धकांचा एक संघ अशा केवळ तीन अधिकृत प्रवेशिका स्विकारल्या जातील.

आपल्या महाविद्यालयाचे विद्यार्थी वक्तृत्वकौशल्य सिद्ध करण्यासाठी या स्पर्धेत हमखास सहभाग नोंदवतील, अशी आशा आहे.

अधिक माहितीसाठी स्पर्धेविषयीची pdf ईमेलसोबत जोडलेली आहे.

आपल्या सहभागाची उत्सुकतेने वाट पाहत आहोत!

निरंजन पाटील,

चाणक्य मंडल परिवार.

Chanakya Mandal Pariwar <https://chanakyamandal.org/>
Mb : 9765605858